# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आज गरज : डॉ.एम.के.कांबळे




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.एम.के.कांबळे समवेत डॉ.मनीषा पाटील, डॉ. एस. एस. कुरलीकर, डॉ. बी. एन.रावण, डॉ. विजयकुमार पाटील, डॉ.उषा पवार

भारताला विकसित राष्ट्र म्हणून निर्माण करावयाचे असेल तर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आज गरज आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीला उद्योगाचा दर्जा देण्याची मागणी केली होती.शेतकरी स्वावलंबी झाला तर देशाचा विकास होईल.त्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी नद्या जोड प्रकल्प हाती घेतला पाहिजे म्हणजे शेतकरी दुष्काळाशी सामना करता येईल, शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सिंचन प्रकल्प उभारण्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांची उन्नती झाली तर देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली होती.तसेच कामगार,श्रमजीवी वर्ग, दलित व स्त्रीयासाठी फार मोठे काम केलेले आहे त्यांचे हे विचार आपण पुढे चालवणे गरजेचे आहे असे आवाहन डॉ.एम.के.कांबळे यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यान प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.एम.के.कांबळे बोलत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन वरिष्ठ लिपिक प्रकाश शेलार व कनिष्ठ लिपिक व सी. डी. सी. सदस्य बबन चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विजयकुमार पाटील म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य संपुर्ण जगाला समजले आहे. त्यामुळेच आज जगात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १९२ देशामध्ये साजरी केली जाते.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अफाट बुद्धिमत्तेचे होते त्यांच्या मते शिक्षण हे समाज बदलण्याचे माध्यम आहे.त्यामुळे ते सर्वांनी घेतले पाहिजे यासाठी त्यांचा आग्रह होता.राष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर सर्व समाजाचा विकास झाला पाहिजे ही त्यांची भावना होती.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण, सहसमन्वयक डॉ. एस. एस. कुरलीकर, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनीषा पाटील यांनी केले आभार डॉ.यु.एन.लाड यांनी मानले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.